imc

सिग्नल शाळा
समर्थ भारत व्यासपीठाचा उपक्रम

# सिग्नल वरील बेघर व स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणारा पॅटर्न ...

## ही शाळा नाही, हा बदलाचा प्रवास आहे

### चेंबूर सिग्नल शाळा

कार्य अहवाल मार्च २०२६















# पूर्व प्राथमिक

## बोटांचे व्यायाम व रंगओळख

बोटांची पकड मजबूत व्हावी आणि सूक्ष्म हालचालींचा (fine motor skills) विकास व्हावा या उद्देशाने पूर्व प्राथमिक मुलांकडून विविध शैक्षणिक क्रिया करून घेण्यात येत आहेत. त्यामध्ये दिलेल्या चित्रांना रंगविणे आणि मणी दोऱ्यात ओवणे हे शैक्षणिक उपक्रम घेण्यात आले.

चित्र रंगविताना मुलांनी वेगवेगळे रंग ओळखून, त्यांचा दिलेल्या चित्रात योग्य ठिकाणी वापर केला. या प्रक्रियेत मुलांची एकाग्रता वाढली तसेच हात आणि डोळ्यांचा समन्वय (hand-eye coordination) सुधारण्यास मदत झाली. रंग भरताना बोटांचा योग्य वापर झाल्यामुळे त्यांच्या बोटांची पकड अधिक मजबूत झाली.





# बोटांचे व्यायाम व रंगओळख

तसेच मणी दोऱ्यात ओवण्याच्या क्रियेत मुलांनी लहान मण्यांना अचूकपणे पकडून दोऱ्यात ओवण्याचा सराव केला. या उपक्रमामुळे बोटांची हालचाल अधिक नियंत्रित झाली, संयम वाढला आणि सूक्ष्म हालचालींचा सराव झाला. मण्यांच्या विविध रंगांमुळे मुलांना रंगांची ओळख अधिक चांगल्या प्रकारे झाली. या सर्व क्रियांमुळे मुलांचा बौद्धिक व शारीरिक विकास साधला गेला. बोटांची पकड मजबूत होण्याबरोबरच त्यांच्या सर्जनशीलतेस वाव मिळाला.










# चित्रांतून परिसर ज्ञान

पूर्व प्राथमिकच्या मुलांना वाहनांचे विविध प्रकार आणि त्यांचे मार्ग चित्रांच्या माध्यमातून मुलांना समजावून सांगण्यात आले. रस्त्यावर चालणारी वाहने (जसे कार, बस), पाण्यात चालणारी वाहने (जसे बोट, जहाज) आणि आकाशात उडणारी वाहने (जसे विमान) यांची ओळख चित्रांद्वारे करून देण्यात आली. प्रत्येक वाहन कोणत्या मार्गावर चालते याबद्दल मुलांशी संवाद साधण्यात आला. या क्रियेमुळे मुलांची निरीक्षणशक्ती वाढली, तसेच चित्रांच्या साहाय्याने शिकवल्यामुळे मुलांना विषय अधिक स्पष्ट आणि लक्षात राहणारा झाला.










# चित्रांतून परिसर ज्ञान

तसेच विविध फळांच्या लाकडी प्रतिकृतींच्या खेळाच्या माध्यमातून मुलांना फळांची ओळख करून देण्यात आली. या खेळात मुलांनी वेगवेगळ्या फळांच्या आकार, रंग आणि नावांची माहिती घेतली. लाकडी फळे हाताळताना मुलांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला, ज्यामुळे त्यांची समज अधिक दृढ झाली. या उपक्रमातून मुलांनी फळांची नावे ओळखली, रंगांची जाण वाढवली आणि त्यांच्या स्पर्शज्ञानाचाही विकास झाला. या सर्व उपक्रमांमुळे मुलांचा बौद्धिक विकास, भाषा कौशल्ये आणि समज वाढण्यास मदत झाली. खेळाच्या माध्यमातून शिकण्यामुळे मुलांमध्ये शिकण्याची आवड निर्माण होण्यास मदत होते.











# प्राथमिक

प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना एक अंकीय बेरीज व वजाबाकी शिकवताना सुरुवातीला सोप्या आणि दैनंदिन जीवनाशी संबंधित उदाहरणांचा उपयोग करण्यात आला. उदा., फळे, खेळणी किंवा चित्रांच्या माध्यमातून मुलांना संख्यांची ओळख करून देण्यात आली. त्यानंतर हळूहळू बेरीज आणि वजाबाकीच्या सोप्या क्रिया करून घेण्यात आल्या. मुलांना समज सुलभ व्हावी म्हणून आकडेमोड प्रत्यक्ष वस्तू मोजून दाखवण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांची गणिताविषयी भीती कमी झाली आणि त्यांचा आत्मविश्वास वाढला.




कुटुंब या घटकाचे अध्यापन करताना वर्गातच एक कौटुंबिक वृक्ष (Family Tree) तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावे त्यांच्या मातृभाषेत म्हणजेच पारधी भाषेत सांगायला लावून आजोबा, आजी, आई, वडील, भाऊ, बहीण इत्यादी नातेसंबंध समजावून सांगितले. या उपक्रमामुळे मुलांना कुटुंबाची रचना आणि प्रत्येक सदस्याचे स्थान समजण्यास मदत झाली.









# प्राथमिक

हस्तकला विषयात विद्यार्थ्यांना कागदापासून फुले बनविण्याचा उपक्रम घेण्यात आला. प्रथम शिक्षकांनी टप्प्याटप्प्याने कागदी फुल बनविण्याची पद्धत दाखवली. त्यानंतर विद्यार्थ्यांना रंगीत कागद, कात्री आणि गोंद यांच्या सहाय्याने स्वतः फुले तयार करण्यास प्रोत्साहित केले. या क्रियेमुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, सूक्ष्म हालचाली (fine motor skills) आणि कलात्मक अभिव्यक्ती विकसित झाली. तसेच त्यांनी तयार केलेली फुले वर्ग सजावटीसाठी वापरण्यात आली.












# माध्यमिक

माध्यमिक वर्गातील मुलांसाठी भौगोलिक आणि गणितीय संकल्पना शिकविण्यासाठी विशेष शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. सर्वप्रथम, जमिनीचे थर (Soil Layers) याची संकल्पना विद्यार्थ्यांना समजावण्यासाठी वर्गात पुठ्ठ्याच्या प्रतिकृती तयार करण्यात आली. या पुठ्ठ्याच्या प्रतिकृतीत विविध रंगांचा वापर करून जमिनीतील भिन्न थर दाखविण्यात आले. शिक्षकांनी प्रत्येक थराचे नाव, त्याचे वैशिष्ट्य, आणि त्यातील जीवनसृष्टीबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रतिकृतीच्या माध्यमातून प्रत्यक्ष थरांचा अनुभव घेतला, ज्यामुळे संकल्पना अधिक स्पष्ट आणि लक्षात राहणारी झाली.














# माध्यमिक

यानंतर, गणितीय संकल्पना जसे की दशक, शतक, हजार या मुलांना समजावण्यासाठी आइस्क्रीम काड्या वापरून तयार केलेले शैक्षणिक साहित्य वापरण्यात आले. विद्यार्थ्यांनी काड्यांच्या साहाय्याने 10, 100, 1000 यांची रचना केली.

तसेच, भौमितीक आकार शिकवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकविण्याची पद्धत वापरण्यात आली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध भौमितीक आकारात झोपवले आणि त्यांना त्या आकाराचे प्रत्यक्ष रूप तयार करण्यास सांगितले. उदाहरणार्थ, चौकोनावस्थेत झोपून विद्यार्थ्यांनी चौकोन तयार केला, आयत, त्रिकोण आणि इतर भौमितीय आकृत्यांमध्ये देखील हे प्रयोग केले. ह्या प्रत्यक्ष अनुभवामुळे मुलांमध्ये भौमितीक आकारांची समज सखोल झाली.





# प्रयोग प्रात्यक्षिक

प्रयोगशाळेत लंबकाच्या प्रतिकृतीच्या माध्यमातून साधा लंबक म्हणजे काय, लंबकाची क्रिया, त्याचा उपयोग वैशिष्ट्ये मुलांना समजविण्यात आले. एकाच आधाराला ३ वेगवेगळे धागे आणि त्यांना ३ स्वतंत्र गोळे बांधले, तर त्याला 'मल्टिपल पेंडुलम' (Multiple Pendulums) म्हणतात हे मुलांना शिकविण्यात आले.

जेव्हा मुलांनी समान लांबीचा एक गोळा हलवता, तेव्हा त्याची ऊर्जा मुख्य दोरीद्वारे दुसऱ्या समान लांबीच्या गोळ्याकडे जाते. थोड्या वेळाने दुसरा गोळा आपोआप हलू लागतो आणि पहिला गोळा थांबतो. हे मुलांनी प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून अनुभवले. ज्या धाग्याची लांबी वेगळी आहे, तो गोळा मात्र फारसा हलत नाही हे मुलांना समजले. परिणामी, लंबक झुलताना दोलन, कालावधी आणि गुरुत्वाकर्षण क्रिया मुलांना समजल्या.













# बीजांकुरण प्रक्रिया

वर्गात विद्यार्थ्यांना बीजांकुरण या विषयाचे प्रत्यक्ष अध्यापन करण्यात आले. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना बीजांकुरण म्हणजे काय, बी कशी पेरावी, कुंडीतील मातीचे योग्य प्रमाण, तसेच बीजपत्र म्हणजे काय, याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

प्रथम विद्यार्थ्यांना बीजांकुरणाची संकल्पना समजावून सांगितली. बीजांकुरण होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पाणी, हवा व उष्णता या घटकांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर अंकुरणाची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगितली, ज्यामध्ये बी पाणी शोषते, बीचे कवच फुटते, मुळ (radicle) प्रथम बाहेर येते आणि त्यानंतर खोड (plumule) वरच्या दिशेने वाढते, हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकण्यासाठी कुंडीत बी पेरण्याचा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी योग्य प्रमाणात माती एकत्र करून कुंडी तयार केली व त्यामध्ये योग्य पद्धतीने बी पेरली. बी पेरताना खोलाई, पाणी देण्याची पद्धत आणि कुंडी योग्य ठिकाणी ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.











# बीजांकुरण प्रक्रिया

तसेच विद्यार्थ्यांना “बीजपत्र” म्हणजे काय हे समजावून सांगितले. या संपूर्ण प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून “बीजांकुरण तक्ता” तयार करून घेण्यात आला. या तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांनी दररोज होणारे बदल नोंदवले. यामुळे त्यांना अंकुरणाची प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवातून समजण्यास मदत झाली. प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकल्यामुळे विद्यार्थ्यांना बीजांकुरणाची संकल्पना अधिक स्पष्टपणे समजली. प्रात्यक्षिक व निरीक्षणाधारित अध्यापनामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक दृढ झाले.










# पाककला प्रशिक्षण

शाळेत १० वर्षांवरील सर्व मुला-मुलींसाठी पाककला वर्ग सुरु करण्यात आला आहे. या वर्गाचा उद्देश फक्त पदार्थ बनवायला शिकवणे नाही, तर मुलांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने, व्यक्तीमत्त्व विकासाच्या दृष्टीने हा वर्ग सुरु करण्यात आलेला आहे. ज्यात योग्य निर्णयक्षमता, अचूकता, जबाबदारी, निरीक्षण या गुणांचा विकास होण्यास मदत होईल.

प्राथमिक स्वरुपात मुलांना या विषयातील  सुरक्षितता, स्वच्छता, उपकरणांची ओळख आणि कच्च्या पदार्थांची माहिती देण्यात येणार आहे. सुरुवातीला, मुलांना भांडी, पॅन, बाऊल, स्पॅचुला, व्हिस्क आणि बेकिंगसाठी लागणारे ट्रे यांचा उपयोग कसा करावा हे दाखवले गेले. त्यांना मायक्रोव्ह आणि इंडक्शन प्लेट्स वापरताना काळजी कशी घ्यावी हेही शिकवले. तसेच, पदार्थ बनविण्यासाठी कच्च्या पदार्थांची ओळख करून देण्यात आली.






# पाककला प्रशिक्षण

शिक्षकांनी मुलांना हात स्वच्छ ठेवणे, भांडी नीट वापरणे, सुरक्षितपणे पदार्थ बनवणे आणि वर्गात शिस्त पाळणे याबाबत नियम सांगितले. तसेच बेकिंगसाठी लागणारे ट्रे, मोल्ड्स आणि पॅन योग्य प्रकारे कसे वापरायचे हे प्रत्यक्ष दाखवले. या पूर्व तयारीमुळे मुलांना पाककला सत्रात आत्मविश्वास मिळण्यास मदत होईल. पाककला वर्गामुळे मुलांचे अनुभव वाढतील आणि ते स्वयंपाकाची मूलभूत माहिती सहज आत्मसात करतील.









# संगणक प्रशिक्षण

शाळेत मुलांना पहिल्यांदाच संगणक प्रशिक्षण दिले जात आहे. सुरुवातीला मुलांना संगणकाची भीतीवाटू नये म्हणून अत्यंत सोप्या भाषेत संगणकाचे भाग समजावले गेले.


शिक्षकांनी मुलांना संगणकाचे मुख्य भाग मॉनिटर, माऊस, की-बोर्ड हे भाग समजावले. मुलांनी हे भाग प्रत्यक्ष पाहून आणि हाताळून समजून घेतले.

त्यानंतर मुलांना संगणक सुरु करणे आणि बंद करणे याची पद्धत शिकवली गेली. शिक्षकांनी सांगितले की संगणक सुरु करताना योग्य बटण दाबावे आणि सुरुवात झाल्यावर सावधगिरी बाळगावी. या प्रशिक्षणामुळे मुलांना संगणकाची ओळख झाली आणि त्यांची भीती दूर झाली. मुलांना आता संगणकाचे भाग, माऊस, की-बोर्ड आणि मॉनिटर कसे वापरायचे हे समजले. तसेच संगणक सुरु व बंद करण्याच्या क्रिया देखील शिकल्या. या प्राथमिक ओळखीमुळे पुढील संगणक प्रशिक्षण मुलांसाठी सोपे आणि मजेदार झाले.







# गुढीपाडवा - आमची शिक्षाश्री म्हणजे विद्यावर्धनाची गुढी

यंदाच्या गुढीपाडव्याचे आकर्षण होते सिग्नल शाळेचे माजी विद्यार्थी.

सिग्नल शाळेची गुढी म्हणजे विद्यार्थ्यांची शिक्षाश्री. म्हणजेच विद्यार्थ्यांचं शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक अर्थात परिवर्तनीय यश ! १० वर्षांपूर्वी मुलांच्या रस्त्यावरच्या जिंदगाणीला लाभलेला शिक्षणाचा परिसस्पर्श ! ही शिक्षणाची दिशा मुलांना उन्नती, प्रगती, यश यांच्यापर्यंत घेऊन गेली. याचेच प्रतीक म्हणजे 'शिक्षाश्री'. ज्ञानाची वृद्धी करत समृद्धीकडे आत्मविश्वासाने उभी करणारी सिग्नल शाळेचे गुढी. सिग्नल शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी येत्या चैत्रनवरात्राच्या शुभमुहूर्तावर तिन्ही सिग्नल शाळेत ज्ञानवर्धनाची गुढी उभारली. ही शाळेबाह्य मुलांची गुढी पारंपरिक धार्मिक गुढीपेक्षा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे रूपांतरण करणारी ठरली.

अमर महल, चेंबूर येथील सिग्नल शाळेत कु. मोहन काळे या माजी विद्यार्थ्यांस प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. आपल्यासारख्याच कुटुंबातून येणाऱ्या मोहनने अत्यंत जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर आपले शिक्षण दहावीपर्यंत पूर्ण केले असून त्याचा हा प्रेरणादायी प्रवास शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरावा, या उद्देशाने त्याला बोलावण्यात आले होते.







# गुढीपाडवा - आमची शिक्षाश्री म्हणजे विद्यावर्धनाची गुढी

सिग्नल शाळा ते इलेक्ट्रॉनिक डिप्लोमा इंजीनिअरिंगचे शिक्षण असा मोहनचा प्रवास प्रोजेक्टरच्या माध्यमातून इतर मुलांना दाखवण्यात आला. छोटेखानी मोहनची मुलाखत मुलांनी घेतली. इलेक्ट्रॉनिक डिप्लोमा इंजीनिअरिंगचे शिक्षण कसे होते, १० वी कशी उत्तीर्ण केली, पालकांचा पाठिंबा कसा होता, असे अनेक प्रश्न मुलांनी मोहनला विचारले. अशा अनेक प्रश्नांची मोहनने मनमोकळेपणाने उत्तरे दिली. त्याने आपल्या यशामागील मेहनत, वेळेचे नियोजन, तसेच कुटुंबाच्या पाठिंब्याचे महत्त्व यावर विशेष भर दिला.

मोहनची प्रगती पाहून मुलांना आनंद झाला. इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आणि त्यांनीही आपल्या आयुष्यात काहीतरी मोठे करण्याची इच्छा व्यक्त केली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास वाढला आणि त्यांनीही आपले ध्येय निश्चित करण्याचा निर्धार केला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी खिरीचा आस्वाद घेत गुढीपाडवा आनंदात साजरा केला. एकंदर हा कार्यक्रम उत्साहवर्धक, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.









# होळी

शाळेत होळी सणाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना होळी सणाविषयी माहिती देण्यात आली. तसेच सणाशी संबंधित शैक्षणिक चित्रपट दाखवण्यात आला. यात होळीचा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोन समजावून सांगितला गेला.

शाळेच्या आवारात विद्यार्थ्यांसाठी छोटी होळी उभारण्यात आली. या उपक्रमाद्वारे मुलांना होळी फक्त रंगांचा सण नसून, चांगल्या संस्कारांचा सण असल्याचेही पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी या प्रसंगी आपापल्या चुकीच्या सवयींबद्दल विचार केला आणि “मी खोटे बोलणार नाही”, “मी शिव्या देणार नाही” अशा वाईट सवयींचा त्याग करण्याचा निर्णय व्यक्त केला. या नकारात्मक सवयी पानावर लिहून विद्यार्थ्यांनी होळीमध्ये टाकल्या, ज्यामुळे वाईट सवयींचा नाश होईल आणि चांगल्या सवयींचा विकास होईल, हा संदेश दिला गेला.











# होळी

याशिवाय रंगपंचमीच्या उपक्रमात नैसर्गिक रंगांचा वापर करून विद्यार्थ्यांनी आनंदाने रंगपंचमी साजरी केली. विद्यार्थ्यांना रंगांचा आणि निसर्गाशी साधलेल्या संबंधाचा अनुभव घेतला गेला. नैसर्गिक रंग वापरण्यामुळे पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेशही विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यात आला.

या सणाच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना होळीचा सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजले, वाईट सवयींचा त्याग करण्याची प्रेरणा मिळाली आणि नैसर्गिक रंगांचा वापर करून पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे महत्त्वही त्यांनी जाणले.











# रामनवमी

रामनवमीनिमित्त विद्यार्थ्यांना श्रीरामाच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग समजून घेण्यासाठी सर्वप्रथम, प्रोजेक्टरच्या माध्यमातून रामायणातील काही प्रसंग विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. यामध्ये मुख्यतः श्रीरामाच्या बालपणीचे प्रसंग, सीतेच्या हरणाचे प्रसंग, आणि धनुषधारी रामाचे धाडसी कृत्य दाखवण्यात आले. यानंतर, विद्यार्थ्यांना श्रीरामाच्या धनुष्यधारी रूपाचे चित्र काढण्यासाठी प्रोत्साहित केले गेले. मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या कल्पकतेने आणि कौशल्याने धनुष्य हाताळलेल्या रामाचे सुंदर चित्र काढले. शिवाय, शिक्षकांनी प्रत्येक चित्राबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि रामनवमीच्या धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वाबद्दल संक्षिप्त माहिती दिली. या उपक्रमामुळे मुलांमध्ये संस्कृती, नैतिकता याबद्दल जाणिव वाढली तसेच त्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली.







# सिग्नल शाळा, उद्घाटन सोहळा

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय अर्थसहाय्यित, बृहन्मुंबई महानगरपालिका पुरस्कृत तसेच समर्थ भारत व्यासपीठ संचालित सिग्नल शाळेचे लोकार्पण मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे यांच्या हस्ते दिनांक २३ मार्च २०२६ रोजी करण्यात आले.

बेघर, स्थलांतरीत, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणारी सिग्नल शाळा मुंबई महानगरात सुरु झाली. नव्या शैक्षणिक धोरणांना अंगीकारत सुरु झालेला हा अभिनव प्रयोग विकसित भारत प्रयत्नांमध्ये मोलाचा भाग ठरणारा आहे. येत्या काळात देश-विदेशातील पर्यटक मुंबईत येतील, तेव्हा या सिग्नल शाळेला आवर्जून भेट देतील, असा विश्वास मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे यांनी उद्घाटनाप्रसंगी व्यक्त केला..












# सिग्नल शाळा, उद्‌घाटन सोहळा

चेंबूर परिसरात अमर महल येथे सांताक्रुझ चेंबूर जोड मार्ग उड्डाणपुलाखाली सिग्नल शाळा सुरु करण्यात आली आहे. शाळाबाह्य आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी सिग्नल शाळा ही संकल्पना ठाणे आणि नेरूळ मध्ये समर्थ भारत व्यासपीठ संस्थेने राबवली आहे. त्याच्या लोकार्पण सोहळ्यास महापौरांसह एम पश्चिम प्रभाग समिती अध्यक्ष श्रीमती आशा मराठे, नगरसेविका श्रीमती कशिश फुलवारिया, उपायुक्त (शिक्षण) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर, एम पश्चिम विभागाचे सहायक आयुक्त श्री. शंकर भोसले, उपशिक्षणाधिकारी श्री. मुख्तार शहा, समर्थ भारत व्यासपीठ संस्थेचे संचालक श्री. अजय जोशी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भटू सावंत, श्री. उल्हास कार्ले, श्रीमती अदिती दाते, श्री. निखिल सुळे, तसेच मुलांना संघटित करण्यात योगदान देणारे आदिवासी पारधी महासंघाचे श्री. संतोष पवार यांच्यासह विविध मान्यवर, स्थानिक नागरिक, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.

प्रारंभी महापौरांच्या हस्ते नामफलक अनावरण करण्यात आले. तसेच, प्राथमिक वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर व्यवसाय प्रशिक्षण, लघूउद्योग प्रशिक्षण, पाककला प्रशिक्षण, रोबोटिक लॅब, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा या सर्वांची मान्यवरांनी पाहणी केली. सिग्नल शाळेच्या स्वतंत्र शिक्षण पद्धतीवर आधारित कृती पुस्तकांचे प्रकाशन देखील महापौर श्रीमती तावडे यांच्या हस्ते करण्यात आले.










# सिग्नल शाळा, उद्घाटन सोहळा

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपआयुक्त (शिक्षण) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर यांनी केले. त्या म्हणाल्या की, सिग्नल शाळेसारखा समाज हिताचा प्रयोग ठाणे, नेरुळ पाठोपाठ आता मुंबई महानगरांत राबविण्यात येत आहे. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्या आर्थिक साहाय्याने व मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुंबईतील पहिली सिग्नल शाळा आज सुरु झाली आहे. शिक्षणासोबतच आहार, तंत्रज्ञान शिक्षण, मानसिक स्थैर्य असं सगळं काही या शाळेत पुरवले जाते. या शाळेतील मुले साक्षर होवून पुढे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये, मुख्य शैक्षणिक प्रवाहात येतील, यावरही भर देण्यात आला आहे. त्यादिशेने या शाळेच्या माध्यमातून पहिलं पाऊल टाकण्यात आलं आहे.







# सिग्नल शाळा, उद्घाटन सोहळा

संस्थेच्या वतीने माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भटू सावंत म्हणाले की, उदरनिर्वाहाच्या शोधासाठी महानगरांकडे काही वर्षांपूर्वी स्थलांतरीत झालेले भटके विमुक्त कुटुंब, विविध उड्डाणपुले, पदपथांवर निवास करत असतात. अशा कुटुंबातील मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासनही प्रयत्न करीत आहे. मुख्य प्रवाहातील शाळा अशा मुलांसाठी लवचिक नसल्याने त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, मानसिक अनुशेषावर काम करण्याचे प्रयत्न समर्थ भारत व्यासपीठ संस्थेने सिग्नल शाळेच्या माध्यमातून केले आहे. यामुळे अनेक मुले शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आली. काही उच्च शिक्षण घेऊन रोजगारक्षम झाली. ठाण्याच्या धर्तीवर मुंबईत देखील सिग्नल शाळा उभी रहावी यासाठी मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री श्री. आशिष शेलार व सहपालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी पुढाकार घेतला. श्री. लोढा यांनी जिल्हा नियोजन निधीतून अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले. त्यातून वर्ग भरवण्यासाठी कंटेनर व इतर साहित्य आदी उपलब्ध करुन घेतले. त्यामुळे ही शाळा उभी राहू शकली, असे सांगून श्री. सावंत यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



